ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 33.

वर्ष २७ पुणें, बुधवार तारीख १५ मार्च, १९६१ अंक ६

## विविध माहिती

**साखरेचें उत्पादन व निर्यात**— १९६०-६१ च्या साखरेच्या हंगामांतील उत्पादनांपैकी ५ लाख टन साखर शिल्लक राहील असा अंदाज करण्यांत आला आहे. सप्टेंबर १९६० मध्यें ५०,००० टन व जानेवारी १९६१ मध्यें आणखी ५०,००० टन साखर निर्यातीसाठी खुली करण्यांत आली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेंत साखर विकण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याचप्रमाणें अमेरिकेकडून भारतीय साखरेच्या आयातीला परवानगी मिळविण्याची खटपट करण्यांत येत आहे.

**राजधानी हलविण्याचा खर्च**—गेल्या नोव्हेंबरमध्यें महाराष्ट्र राज्याची राजधानी तात्पुरती नागपूरला नेण्यांत आली होती. तेथून कारभार चालविण्यासाठी सरकारच्या कांहीं कचेऱ्याहि हलविण्यांत आल्या होत्या. कचेऱ्यांसाठी व इतर सरंजामासाठी सरकारला जागेची सोय करावी लागली. त्यासाठी १७ लाख रुपये खर्च करण्यांत आला. कचेऱ्यांच्या जागेसाठी व राहण्याच्या जागेसाठी इमारती बांधण्याचा सरकार विचार करीत आहे.

**इस्पितळाला मदत**—समाजविकास योजनेसाठी नर्सेसना व दायांना शिक्षण देण्यांत येत असतें. हें शिक्षण देण्यासाठी मदत म्हणून मध्यवर्ती सरकारनें पुणें येथील के. ई. एम्. इस्पितळाला रु. १३,२०० मदतीदाखल दिले आहेत. सरकारतर्फे ह्या कामासाठी मिळणारा हा तिसरा हप्ता आहे.

**भारताकडून मदतीची अपेक्षा**—आसाममधील दारांग गांवापासून पूर्व भूतानपर्यंत एक रस्ता तयार करण्याचें काम सरकारनें चालू केलेलें आहे. पण ह्या कामीं भारत सरकारच्या सरहद्दीवरील रस्ते बांधण्याच्या संघटनेनें मदत करावी अशी अपेक्षा करण्यांत येत आहे. रस्त्याची लांबी १०० मैलांची आहे. भारत सरकारची संघटना कांहीं पुलांच्या बाबतींत मदत करीत आहेत.

**कच्छच्या रणांतील जमीन**—कच्छमधील छोट्या रणांतील ३ लाख एकर जमीन लागवडीयोग्य करण्याची योजना गुजरात सरकारनें आंखली आहे. ह्याची प्राथमिक तयारी करण्याचें काम लवकरच सुरू होईल. ही योजना तीन टप्प्यांनीं पुरी करण्यांत येणार आहे. योजनेसाठी लागणारी तांत्रिक मदत मात्र मध्यवर्ती सरकारतर्फे पुरविण्यांत येणार आहे.

**तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चलनवृद्धि**—राजकोट येथील रोटरी क्लबांत बोलतांना सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. श्रॉफ ह्यांनीं असा अंदाज केला कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत अपेक्षेपेक्षा अधिक चलनवृद्धि होईल.

**नियोजित हल्ल्याचा पुरावा**—भारताच्या कराची येथील हायकमिशनरच्या कचेरीवर पाकिस्तानमधील निदर्शकांच्या बऱ्याच मोठ्या जमावानें दगडफेक केली. त्या वेळीं पाकिस्तान-सरकारचे २०० पोलिस व अधिकारी हा प्रकार ४० मिनिटें पाहात होते. त्यानंतर पोलिसांनीं एक शिटी वाजविली. त्याबरोबर जणू कांहीं आधीं ठरल्याप्रमाणें निदर्शक निघून गेले.

**एंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांत स्त्रिया**—रुरकी येथील एंजिनिअरिंग विद्यापीठांत १०-१२ विद्यार्थिनी दाखल झाल्या आहेत. टेलिकम्युनिकेशन्स व आर्किटेक्चर ह्या विषयांचा अभ्यासक्रम घेण्यांत त्यांचा विशेष कल दिसून आला. केरळ, राजस्थान, दिल्ली व उत्तरप्रदेश ह्या राज्यांतून त्या आलेल्या आहेत. एंजिनिअरिंगच्या इतर शाखांबद्दल त्यांची अनास्था आहे असें मात्र नाहीं.

**अश्लील वाङ्मयाची आयात**—डी. एच. लॉरेन्स ह्या इंग्लिश लेखकाची, अश्लील गणली गेलेली कादंबरी ब्रिटनमध्यें कांहीं महिन्यांपूर्वी त्या कलंकांतून मोकळी झाली. नंतर कादंबरीच्या कांहीं प्रती मुंबईंत आयात झाल्या. परदेशांतून आयात होणाऱ्या अशा प्रकारच्या वाङ्मयासंबंधीं कस्टमच्या अधिकाऱ्यांना मदत करण्यासाठी मुंबई, कलकत्ता, मद्रास व कोचीन ह्या बंदरांत वाङ्मयविशारदांची एक सल्लागार समिति नेमण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांतील तेलाचा शोध**—पाकिस्तानांतील खनिज तेलाचा शोध करण्याच्या कामीं पाकिस्तान व रशिया ह्यांच्यांत करार करण्यांत आला आहे. रशिआ पाकिस्तानला ह्या कामासाठी ३ कोटी डॉलर्स कर्ज देणार आहे. कर्जाची मुदत १२ वर्षांची असून त्यावर २॥ टके व्याज घेण्यांत येणार आहे. त्याशिवाय रशिया तांत्रिक मदतहि देणार आहे.

**जर्मन तंत्रज्ञांची तुकडी**—आर्थिकदृष्ट्या अविकसित असलेल्या देशांत काम करण्यासाठी पश्चिम जर्मन सरकार तंत्रज्ञांची तुकडी तयार करीत आहे. तंत्रज्ञ, एंजिनिअर्स, डॉक्टर्स व शिक्षक पेशाच्या १,००० तरुणांकडे ह्या बाबतींत विचारणा करण्यांत आली आहे. त्यांपैकीं पुष्कळ जणांनीं परदेशांत जाऊन काम करण्याची तयारीहि दाखविली आहे.

**महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या**—महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या आतां ३·९५ कोटी झाली आहे. १९५१ मध्यें ती ३·२ कोटी होती. म्हणजे वाढ २३·४४% झाली. मुंबई शहराची लोकसंख्या ३८·४७% नें वाढून ती ४१·४६ लक्ष झाली आहे.

**पुण्यांत नवें लेबर कोर्ट**—पुणें येथें महाराष्ट्र बँकेच्या इमारतींत नवें लेबर कोर्ट सुरू झालें आहे.

**पिकांच्या विम्याची योजना**—नैसर्गिक आपत्तींनीं शेतकऱ्यांची होणारी नुकसानी टाळण्यासाठीं पंजाब सरकार चालू वर्षी पिकांच्या विम्याची योजना चालू करणार आहे. प्रथम ही योजना पंजाबमधील सहा निवडक जिल्ह्यांतील पिकांना लागू करण्यांत येईल. ह्या पिकांत गहू, कापूस व ऊंस ह्यांचा समावेश आहे. योजनेला यश आल्यास ती इतर जिल्ह्यांतहि अमलांत आणण्यांत येईल.

**जर्मन चलनाची किंमत**—पश्चिम जर्मनीच्या सरकारनें आपल्या चलनाची किंमत वाढविली आहे. अमेरिकेच्या व ब्रिटनच्या जर्मनींतील लष्कराच्या खर्चावर ह्याचा परिणाम होणार आहे. अमेरिकेला आपल्या लष्करासाठीं ३ कोटी डॉलर्स अधिक खर्चावे लागतील आणि ब्रिटनला ३० लाख पौंड अधिक खर्चावे लागतील. ह्याबद्दल जर्मन सरकारकडून कांहीं नुकसानभरपाई मिळेल कीं नाहीं तें अद्याप ठरलेलें नाहीं.

**गुजरातमध्यें शेतकी कॉलेज**— दक्षिण गुजरातमध्यें नवें शेतकी कॉलेज काढण्यांत येणार आहे. राज्याच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ह्या कामाच्या भांडवली खर्चासाठी ५ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. सध्यां राज्यांत आनंद व जुनागड येथें शेतकी कॉलेजें आहेत. जुनागडचें कॉलेज गेल्याच वर्षी सुरू झालेलें असून त्यामधील पदवीधर आणखी दोन वर्षांनीं बाहेर पडतील.

**पंजाब विधानसभेची इमारत**—भारताची फाळणी झाल्यावर पंजाबच्या विधानसभेला स्वतंत्र अशी इमारत नव्हती. ११४ लाख रुपये खर्चून विधानसभेसाठी नवी इमारत आतां बांधण्यांत आली आहे. सभेच्या जागीं २५२ सभासदांची सोय करण्यांत आली आहे. मतमोजणीसाठी स्वयंचलित यंत्रयोजना करण्यांत आली आहे. इमारत समशीतोष्ण हवामान राखणारी आहे. इमारतीची कल्पना फ्रेंच वास्तुशास्त्रज्ञाची आहे.

**औषधावरील ग्रंथ नष्ट**—लखनौ येथील सेंट्रल ड्रग रिसर्च इन्स्टिट्यूटचा १० वा वर्षदिन साजरा करण्यांत आला. ह्या प्रसंगी इंडिअन सायन्स काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. मुकर्जी ह्यांनीं अशी माहिती सांगितली, कीं गेल्या ऑक्टोबरमध्यें आलेल्या पुरांत देशी औषधांवरील १,७०० पानांच्या ग्रंथाचें हस्तलिखित नष्ट झालें. हस्तलिखित वरील संस्थेंत होतें. संस्था ५ दिवसपर्यंत पाण्यांत होती.

**सिकिममधील पहिला छापखाना**— सिकिम राज्यांतील पहिला छापखाना गंगटोक येथें काढण्यांत आला आहे. छापखान्यांत नेपाळी व तिबेटी भाषांतील साहित्य छापण्याची सोय आहे. हिमालयाच्या कुशींत असलेल्या ह्या राज्यांत अद्यापपर्यंत छापखाना नव्हता. लोकांना शिक्षणासाठी महाग असणाऱ्या हस्तलिखित पुस्तकांवर अवलंबून राहावें लागे. छापखाना छोटा असला तरी अद्यावत् आहे.


**सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९१८] गिरगांव, मुंबई ४. [टेलि. : २७०१४

**महाराष्ट्राची अग्रेसर सहकारी बँक**

| | | | |
|---|---|---|---|
| भाग भांडवल : | ... | ... | रु. ८,७५,००० |
| रिझर्व्ह फंडस् : | ... | ... | रु. १०,०८,००० |
| ठेवी : | ... | ... | रु. २,४५,५७,००० |
| खेळतें भांडवल : | ... | ... | रु. २,७६,००,००० |

शाखा : फोर्ट, दादर, वरळी, वडाळा, माहीम, पुणें, बेळगांव.


*स्त्रियांची शाखा :* सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई.



**किर्लोस्कर**

स्थापना १८८८

**इलेक्ट्रिक पंपिंग से**



भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्यासाठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतांत. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि.** किर्लोस्करवाडी (द. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. १५ मार्च, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ठेवींच्या वाढीची गति मंदावता कामा नये

स्टेट बँकेचे चेअरमन, श्री. भट्टाचार्य, ह्यांनीं बँकेच्या सहाव्या वार्षिक सभेंत भाषण करतांना बँकांकडील ठेवींच्या वाढीची गति कमी झाल्याबद्दल चिंता प्रदर्शित केली. बँकांकडे कर्जाची मागणी एकसारखी वाढत आहे आणि ती पुरी पाडण्यासाठी बँकांजवळील ठेवींत भरघोस वाढ होणें आवश्यक आहे. स्टेट बँकेनें सेव्हिंग्ज खात्यांतील ठेवींवरील व्याजाचे दर वाढविले, ते ग्रामीण भागांतून ठेवी आकर्षण्यासाठीं; इतर बँकांशीं स्पर्धा करण्याकरितां नव्हे, असा त्यांनीं खुलासा केला. १९५६ ते १९६० ह्या मुदतींत स्टेट बँकेनें ग्रामीण व निमशहरी क्षेत्रांत ४२९ शाखा उघडल्या; नव्या शाखांकडील ठेवी १९६० मध्यें २९·३२ कोटी रु. च्या ३७·०३ कोटी रु. झाल्या; म्हणजे त्यांत ७·७१ कोटी रु. ची वाढ झाली. ही वाढ आणखी खूपच होण्याला भरपूर वाव आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत उघडलेल्या शाखांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी प्रा. द. गो. कर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखाली बोर्डानें एक कमिटी नेमली आहे. बँकेच्या हिशेबाचें काम करण्यासाठी लवकरच मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण करण्यांत येणार आहे. त्यामुळें बँकेची कार्यक्षमता वाढेल, अशी अपेक्षा आहे. लहान रकमेचे चेक्स वटविण्याचे बाबतींतील पद्धत नुकतीच सुधारून विलंब कमी करण्यांत आला आहे. स्टेट बँकेच्या ३३७ शाखा तोट्यांत चालू आहेत; नवी शाखा स्वतःच्या पायावर उभी राहण्याला तिचें पांचवें वर्ष उजाडतें.

## १९६० मध्यें १,६४१ नव्या कंपन्या निघाल्या

एप्रिल, १९५६ मध्यें कंपनीज ॲक्टाच्या अंमलबजावणीस प्रारंभ झाल्यापासून ५,६०० हून अधिक नवीन कंपन्यांची स्थापना झाली. केवळ १९६० मध्येंच देशांत एकूण १,६४१ नवीन कंपन्यांची नोंद झाली. हा एक विक्रम असून या कंपन्यांचें अधिकृत भांडवल २८८ कोटी रुपये आहे. १९५९ चा हा आंकडा अनुक्रमें १,३९९ कंपन्या व १६९ कोटी रुपये असा होता. एप्रिल, १९५६ ते १९६० अखेरपर्यंत नोंदणी झालेल्या एकूण ५,६३८ नवीन कंपन्यांचें अधिकृत भांडवल ९८३ कोटी रु. आहे. या कंपन्यांपैकी ४०६ पब्लिक कंपन्या तर ५,२३२ खाजगी कंपन्या आहेत. या कालांत नोंदणी झालेल्या नवीन कंपन्यांचा आंकडा देशांत सध्यां चालू असलेल्या कंपन्यांच्या सुमारें एक पंचमांश आहे. त्याचप्रमाणें या कालांत चालू असलेल्या कंपन्यांचें वसूल भांडवल सुमारें ६२५ कोटी रु. नीं वाढलें असून त्यांपैकी ४२५ कोटी रु. भांडवल सरकारी क्षेत्रांतील आहे. सन १९६० मध्यें नोंदणी करण्यांत आलेल्या नवीन कंपन्यांपैकी १४१ पब्लिक कंपन्या असून १,५०० खाजगी कंपन्या आहेत व त्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें १५८ कोटी रु. व १३० कोटी रु. आहे. या नवीन कंपन्यांपैकी ३९७ कंपन्या पूर्वीच्या द्विभाषिक मुंबई राज्यांत स्थापन झाल्या आहेत.

## शस्त्रास्त्रांची स्पर्धा बंद झाली तर!

जगांतील बड्या राष्ट्रांत शस्त्रास्त्रांची स्पर्धा चालू असल्यामुळें अपरिमित धनाचा व्यय होत आहे आणि त्याच वेळीं जगांतील बहुसंख्य लोकांना अन्न, वस्त्र व आसरा ह्यासारख्या किमान गरजांनाहि मुकावें लागत आहे. शस्त्रास्त्रांवर खर्च करण्यांत येत असलेला पैसा अविकसित देशांच्या आर्थिक विकासासाठी वापरावा अशी सूचना संयुक्त राष्ट्रसंघांत प्रथम भारतातर्फे करण्यांत आली. १९५० सालीं भारताचे प्रतिनिधी सर बी. एन्. राव ह्यांनीं ही कल्पना मांडली व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या देशांचा तिला जोरदार पाठिंबा मिळाला. तथापि संयुक्त राष्ट्र संघटनेंत ह्या कल्पनेवर आजपर्यंत फक्त चर्चाच झालेली आहे. प्रत्यक्ष कृतीच्या दिशेनें एकहि पाऊल उचललें गेलेलें नाहीं. अमेरिका, रशिआ व इतर प्रगत देश ह्यांनीं ह्या कल्पनेला तात्त्विक पाठिंबा दिलेला आहे. पण अजून अंशतः निःशस्त्रीकरणाची सुद्धां आशा दिसत नाहीं. उलट शस्त्रास्त्रावरील खर्चाचे आंकडे फुगतच चालले आहेत. ह्या खर्चासंबंधीं कल्पना येण्यासाठी कांहीं आंकडे पाहिले पाहिजेत. एक अंदाज असा आहे कीं, जग दर तासाला १·४ कोटी डॉलर्स एवढी प्रचंड रकम शस्त्रास्त्रांवर खर्च करीत आहे. प्रत्येक जिवंत माणसामागें दरसाल ४० डॉलर्स असें हें प्रमाण पडतें. शस्त्रास्त्रांवर होणाऱ्या एकूण खर्चापैकी ७३ टक्के खर्च रशिआ व अमेरिका हे देश करतात. त्यांतहि अमेरिकेचा खर्च पहिल्या क्रमांकाचा आहे. हा खर्च जर थांबला तर ७·५ कोटी लोकांचे श्रम विधायक कामाकडे वळवितां येतील. सध्यां इतके लोक शस्त्रास्त्रें अगर तत्संबंधी माल तयार करण्याच्या कामांत गुंतलेले आहेत. सुमारें १·२ अब्ज लोकांचें राहणीचें मान सुधारता येणें मग शक्य होईल.

## घड्याळांचे आणखी दोन कारखाने

बंगलोर येथें घड्याळें तयार करण्याचा एक कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत काढण्यांत येत आहे. त्याशिवाय खाजगी मालकीच्या विभागांत आणखी दोन घड्याळांचे कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक मुंबई येथें व दुसरा कुन्नूर येथें स्थापन करण्यांत येईल. दिल्लीजवळ गाझिआबाद ह्या ठिकाणीं गजराचीं घड्याळें तयार करण्याच्या कारखान्याचें नुकतेंच उद्घाटन झालें. हा कारखाना जपानच्या मदतीनें उभारण्यांत आला आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी १५ लाख रुपये खर्च आला असून त्यांत उत्पादनाचें अद्यावत् तंत्र वापरण्यांत येणार आहे. त्यामुळें घड्याळें मोठ्या प्रमाणावर तयार होतील. कारखान्याची उत्पादनक्षमता दरसाल ६०,००० घड्याळांची आहे.

## दिल्लींतील बँकेचें विलीनीकरण

प्रभात बँक लि., दिल्ली ही नॅशनल बँक ऑफ लाहोर लि., दिल्ली ह्या बँकेंत ९ मार्च रोजीं विलीन झाल्याचें मध्यवर्ती सरकारनें जाहीर केलें आहे. प्रभात बँकेची जिंदगी व देणी नॅशनल बँक ऑफ लाहोरकडे वर्ग करण्यांत आलीं आहेत.

## सहकारी मुद्रणालय संस्थांची उभारणी

### मुद्रणाचीं व प्रकाशनाचीं कामें करण्यासाठी सहकारी तत्त्वाचा अवलंब

मध्यवर्ती सरकारनें सहकारी तत्त्वावर मुद्रणालयें चालविण्यासंबंधीं प्रगति करतां येईल अशी एक योजना तयार केली असून, ती राज्य सरकारांकडे पाठवून त्यांचे अभिप्राय मागविले आहेत.

समाज विकास व सहकार विभागाच्या मंत्रालयानें ही योजना तयार केलेली असून, तिसऱ्या पं. वा. योजनेच्या काळांत छपाईचें काम खूप वाढणार आहे या अपेक्षेवर ही आधारित आहे. साक्षरतेचा प्रसार झपाट्यानें होत आहे. वृत्तपत्रें, नियतकालिकें, पाठ्य पुस्तकें आणि लेखनासाठी वह्या, चोपड्या, यांसाठी छपाईचें काम वाढत जाणार आहे. शिवाय इतर अनेक प्रकारानें मुद्रणालयांचे कामांत भर पडत जाणार आहे. या दृष्टीनें खाजगी क्षेत्रांत आणि सहकारी क्षेत्रांत आलेल्या मुद्रणालयांचा आपोआपच विकास होत राहील. त्याचबरोबर देशाच्या विविध भागांत सहकारी क्षेत्रांतहि भक्कम पायावर छापखान्यांचीहि वाढ करावी असा विचार या धोरणाच्या मुळाशीं आहे.

प्रत्येक राज्यांत एक मध्यवर्ती सहकारी मुद्रणसंस्था निर्माण करून तिनें मध्यम आकाराचा परंतु सुसज्ज असा छापखाना चालवावा. लेखनाचा व्यवसाय करणारे साहित्यिक व वाङ्मयसेवक आणि या व्यवसायांत प्रविष्ट होणारे लेखक यांना बहुसंख्येनें या संस्थेचे सभासद होण्यास सांगितलें जावें. याशिवाय शाळेतील सहकारी पुस्तक–भांडारें, समाज विकास गटाच्या समित्या, सरकारमान्य ग्रंथालयें व वाचनालयें, साहित्यिकांचे संघ आणि राज्य पातळीवरील सहकारी सोसायट्यांना मुद्रणसंस्थेचें सभासदत्व दिलें जावें अशी कल्पना आहे. लेखकांना सभासद बनविण्यामागें असा उद्देश आहे कीं, प्रकाशकांकडून होणारी पिळवणूक नष्ट करावी आणि सत्पात्र नवोदित लेखक साहित्यिकांना उत्तेजन मिळावें.

ही मध्यवर्ती सोसायटी सरकारकडून, निरनिराळ्या शाळाचालकांकडून आणि पुस्तकें व वह्यांचा व्यापार करणाऱ्या संस्थांकडून पुस्तकें, ग्रंथ व इतर छपाईच्या व प्रकाशनाच्या ऑर्डरी मिळवील आणि जे लेखक साहित्यिक सभासद आहेत त्यांचीं पुस्तकें व प्रकाशनें छापण्याचींहि कामें करील. ही सोसायटी आपलीं स्वतःचीं पुस्तक-विक्रीचीं दुकानें चालवील.

याचे खालच्या पातळीवर जिल्हा सहकारी मुद्रणालयें असतील व त्यांत स्थानिक परिस्थितीनुसार छोटीं छपाईचीं विविध कामें, छोट्या पुस्तकांचीं, अहवालांचीं व माहितीपत्रकांचीं प्रकाशनें, छोटीं नियतकालिकें, इत्यादिविषयीं छपाईचें काम केलें जाईल. सरकारी प्रिंटिंग प्रेसमधील जादा कामें आणि विविध सरकारी खात्यामधील फार्मस्, माहितीपत्रिका आणि प्रकाशनांच्या कित्येक नमुन्यांच्या छपाईचीं कामें अशा जिल्हानिहाय सहकारी मुद्रणालयांतून केलीं जातील.

## दिल्ली कॉर्पोरेशनसाठी सर्वांत उंच इमारत

दिल्ली येथील रामलीला मैदानासमोर दिल्ली कॉर्पोरेशनच्या कचेरीसाठी १६ मजली इमारत बांधण्यांत येणार आहे. इमारतीची १·१० कोटी रुपये खर्चाची योजना कॉर्पोरेशननें मंजूर केली आहे. ही इमारत भारतामधील सर्वांत उंच होईल. पश्चिम बंगाल सरकारच्या सचिवालयाची व मद्रासमधील आयुर्विमा कॉर्पोरेशनची इमारत १३ मजली आहे. ही इमारत भूकंपालाहि दाद न देणारी होईल.

## ज्यू जमातीचा उच्छेद करणाऱ्या गुन्हेगारांची चौकशी

कांहीं महिन्यांपूर्वी रुडाल्फ आइखमन ह्या नाझी गुन्हेगाराला इस्राइल सरकारच्या गुप्त पोलिसांनीं अर्जेंटायनांत अटक करून चौकशीसाठी इस्रायलमध्यें आणलें. रुडाल्फ आइखमन ह्यानें हिटलरच्या आज्ञेवरून १९३९ ते १९४५ ह्या कालांत लक्षावधि ज्यू लोकांना बंदिवासांत टाकलें व त्यांचा अमानुष छळ केला असा आरोप त्याच्यावर आहे. खुद्द आइखमननें आपण केलेलीं सर्व कृत्यें वरिष्ठांचा हुकूम पाळतांना केलीं असा बचाव केला आहे. आतां लवकरच त्याची न्यायालयीन चौकशी सुरू होणार आहे. त्यानें १,३०० पानांची कैफियत सादर केलेली असून ह्यांत आणखी ३८७ प्रमुख जर्मनांचीं नांवें दिलेलीं आहेत. ह्या सर्व लोकांनीं आपणांस मदत केलेली आहे असें त्याचें म्हणणें आहे. रुडाल्फ आइखमनचा वकील आपल्या पक्षकाराला भेटण्यास गेला असतां त्यास भेटण्याची परवानगी प्रथम नाकारण्यांत आला. न जाणो, एखादे वेळीं हा वकील रुडॉल्फ आइखमनला आत्महत्या करण्यास विष पुरवावयाचा, अशी शंका इस्राइल सरकारला आली. पण नंतर बंदुकींच्या गोळीलाहि दाद न देणाऱ्या कांचेच्या पडद्यामागून रुडॉल्फ आइखमनला भेटण्याची परवानगी देण्यांत आली. रुडॉल्फ आइखमनच्या न्यायालयीन चौकशींत शेंकडों अस्सल कागदपत्र दाखल करण्यांत येणार आहेत. हे सर्व कागदपत्र नाझी राजवटींतील अधिकाऱ्यांच्याच हातचे आहेत. आइखमननें जीं नवीन नांवें आपल्या निवेदनांत सांगितलीं आहेत तीं जर्मनींत आज अधिकारपदावर असणाऱ्या व्यक्तींचीं आहेत. त्यामुळें पश्चिम जर्मनींत बऱ्याच ठिकाणीं घबराट उडाला आहे. ह्या सर्व प्रकारामुळें व निवडणूक जवळ आल्यामुळें जर्मन सरकारची मोठी पंचाईत झाली आहे.

## रशिआ व हिंदमधील व्यापारांत झालेली वाढ

रशिआचे उपपंतप्रधान मि. कोसिजिन भारताला भेट देऊन गेले. त्यांच्याबरोबर रशिअन सरकारचे कांहीं नियोजन-तज्ज्ञ व आर्थिक तज्ज्ञहि आले होते. ह्या रशियन प्रतिनिधी मंडळानें आपल्या भेटींत कलकत्त्याचा समावेश केला होता. कलकत्ता येथें एका प्रसंगीं भाषण करतांना मि. कोसिजिन म्हणाले कीं, गेल्या आठ वर्षांच्या काळांत भारत व रशिआ ह्यांच्यामधील व्यापारी देवघेवीची खूपच वाढ झालेली आहे. १९५३ सालीं उभयतां देशांमधील व्यापारी उलाढालीचा आंकडा अवघा १७ लाख रुबल्सचा होता. ह्यांत रशिआनें दिलेल्या कर्जाचा अर्थातच समावेश नाहीं. गेल्या वर्षी व्यापारी उलाढालीचा आंकडा ८·७६ कोटी रुबल्सपर्यंत वाढलेला आहे. उभयतां देशांमधील व्यापार उत्तरोत्तर वाढत जाईल ह्यांत शंका वाटण्याचें कारण नाहीं. भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यान जे आर्थिक करार करण्यांत आले आहेत त्याच्यामुळें उभयतां देशांमधील आर्थिक व्यवहारांचें स्वरूप व व्याप्ति ह्यांच्यांत बदल झालेला आहे. खुद्द रशिआंतील आर्थिक प्रगतीसंबंधीं बोलतांना ते म्हणाले कीं, रशियांत सध्यां सप्तवार्षिक कार्यक्रमाची अंमलबजावणी चालू आहे. १९६५ सालीं हा कार्यक्रम संपत आहे. त्या सुमारास रशिआ औद्योगिक उत्पादनाच्या बाबतींत अमेरिकेच्याहि पुढें जाईल अशी अपेक्षा आहे. गेल्या दोन वर्षांत रशियाचा औद्योगिक उत्पादनांत २२ टक्के वाढ झालेली आहे. उत्पादनवाढीचा हाच वेग चालू राहिल्यास चालू कार्यक्रमाच्या अखेरीस उत्पादन दुपटीनें वाढेल असें मानण्यास जागा आहे. रशिआंतील कामाचे तास ७ ऐवजीं ६ अगर ५ ठेवण्याचा सरकारचा विचार आहे. त्याचबरोबर कामगारांच्या वेतनांत वाढ करण्याचाहि सरकारचा मनोदय आहे.

# ग्रामीण कर्जपुरवठा आणि कार्यक्षम यंत्रणा

## रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, श्री. अय्यंगार, ह्यांचें विवेचन

विदर्भ को. बँकेच्या सुवर्णमहोत्सवाचें उद्घाटन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. अय्यंगार ह्यांनीं गेल्या महिन्यांत केलें. त्यांनीं आपल्या भाषणांत शेतीव्यवसायाला पतपुरवठा करण्याचे बाबतींत रिझर्व्ह बँकेची जबाबदारी कशी वाढत चालली आहे, ग्रामीण भागांत बचतरूपानें पुरेसा पैसा जमा होणें कसें अगत्याचें आहे, थकबाकींत वाढ आणि सहकारी मालविक्रीची अपुरी व्यवस्था ह्यांच्यामुळें जादा कर्जपुरवठ्याचा पुरा फायदा शेतकऱ्यांचे पदरांत कसा पडत नाहीं, ग्रामीण पुढारीपणाचा दर्जा कां व कसा सुधारला पाहिजे, सहकारी क्षेत्रांत राजकीय पक्ष-भूमिका कां नकोत, कार्यक्षमतेची किती आवश्यकता आहे, इत्यादि महत्त्वाच्या गोष्टींचें उत्कृष्ट मार्गदर्शन केलें. पुरेशा कर्जपुरवठ्याच्या प्रश्नांपेक्षा त्या पैशाचा यथायोग्य वापर होण्याची, कार्यक्षम यंत्रणेची, अधिक जरूरी आहे, हें त्यांच्या भाषणाचें सार होतें. त्यांच्या भाषणाचा सारांश येथें दिला आहे :—

ग्रामीण भागांत सहकारी सोसायट्यांद्वारें पतपुरवठा करण्याच्या व्यवस्थेशीं रिझर्व्ह बँकेचा निकटचा संबंध येत आहे. परंतु आमच्या कार्याचें महत्त्व व आमच्या प्रयत्नाची व्याप्ति फारजणांच्या ध्यानांत येत नाहीं. व्यापार उद्योगाच्या क्षेत्रांत कर्जे पुरवठ्याची परिस्थिति नीटनेटकी राहील याकडे रिझर्व्ह बँकेस लक्ष द्यावें लागतें. कांहीं बँका अलीकडे गडगडल्या आहेत. त्यामुळें नाणेबाजारांत स्थैर्य निर्माण करण्याची या बँकेची जबाबदारी वाढली आहे.

नाणें बाजारांत विश्वासाचें वातावरण तयार करण्याची अवघड कामगिरी करीत असतांनाच शेती उत्पादनासाठी पतपुरवठ्याच्या सोयींचा विस्तार करण्याची गरज वाढत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बळ अशा दुव्याकडे यांत लक्ष द्यावयाचें आहे; एवढेंच नव्हे तर छोट्या-मोठ्या अनेक सहकारी सोसायट्यांद्वारें पतपुरवठ्याचें काम होईल अशी व्यवस्था करावयाची असून, उत्कर्षाकडे जाणाऱ्या शेतीविषयक अर्थरचनेचा भरीव सर्वव्यापी पाया घातला जाण्यासाठी कसोशीचे प्रयास करावयाचे आहेत.

पंधरावीस वर्षांमागें शेतीउत्पादनासाठी कर्जे पुरविण्याचेबाबत रिझर्व्ह बँकेकडून कांहींहि हालचाल केली जात नव्हती. आमच्या कार्यक्षेत्रांतील ही शाखा अगदीं निष्क्रिय होती. परंतु आज सर्व राज्यांत या शाखेचीं शेंकडों अधिकारी व कर्मचारी असलेलीं कार्यालयें उघडलीं गेलीं आहेत. सन १९४७–४८ सालीं रिझर्व्ह बँकेनें सहकारी संस्थांना फक्त १७ लाख रुपयांपर्यंत कर्जेपुरवठा केला होता. परंतु आज हीच मर्यादा १०० कोटी रुपयांवर पोहोंचली आहे.

याखेरीज आम्हीं पुरविलेल्या पैशांचा सदुपयोग केला जातो कीं नाहीं हें पाहण्यासाठी पद्धतशीर देखरेखीच्या यंत्रणा उभारल्या आहेत. सहकारी बँका व सोसायट्या आणि विविध सहकारी क्षेत्रांतील कामकाजाबद्दल कर्मचारी वर्गास प्रशिक्षण देण्याकरितां कांहीं संस्थाहि सुरू केल्या आहेत. भरभक्कम पद्धतीनें ग्रामीण पतपुरवठा व्हावा असें ध्येय बँकेनें ठेवलें आहे. आपण पुरविलेला पैसा सुरक्षित राहण्याची काळजी बँकेस घ्यावी लागत आहे.

### रिझर्व्ह बँकेच्या कर्ज-पुरवठ्यांत वाढ

शेतीउत्पादनासाठीं लागणारा बहुतांश पैसा सहकारी संस्थामार्फत पुरविला जावा असें अंतिम ध्येय असलें तरी ही गोष्ट साध्य होण्यास बराच काळ लागणार आहे. दरम्यान तिसऱ्या पं. वा. योजनेंत सध्यां होणारा अल्प मुदतीचा व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा १५० कोटी रुपयांचा आहे तो सुमारें ५०० कोटी पर्यंत वाढविण्याचा आणि सध्यां होणारा दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा ३० कोटी रुपयांवरून ११५ कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचा संकल्प आहे.

सहकारी बँकांकडे जमा होणाऱ्या ठेवींची रक्कम आज फार मोठी नाहीं हें लक्षांत घेतां यांपैकीं ८० टक्के कर्जपुरवठा रिझर्व्ह बँकेसच द्यावा लागणार आहे. असा प्रश्न उपस्थित होतो कीं, एवढ्या मोठ्या प्रमाणांत या बँकेनें पैसा पुरविणें कितपत योग्य आहे. १९४७–४८ सालीं शेतीउत्पादनास केलेल्या १८॥ कोटी रुपये पतपुरवठ्यापैकीं १७ लाख म्हणजे केवळ १ टक्का पैसा बँकेनें दिला. आज एकूण १५० कोटी पतपुरवठ्यापैकीं १०० कोटी रुपये म्हणजे ६६ टक्के पैसा बँक देत आहे. हें प्रमाण फार वेळ इतकें मोठें ठेवणें सहकारी चळवळीसच हानिकारक आहे.

### सहकारी चळवळीपुढील मुख्य कामगिरी

आतां हें खरें आहे, कीं आज ग्रामीण समाजांत पुरेसा पैसा बचतरूपानें गोळा होत नाहीं. म्हणून रिझर्व्ह बँकेस पुष्कळ पैसा द्यावा लागतो याबद्दल फारसा आक्षेप ठेवून चालणार नाहीं. परंतु या मदतीमधून सहकारी पत-पुरवठ्याची व्यवस्था अधिक सबळ होत जाईल व शेवटीं ती सर्व कामगिरी आपणच करण्यास समर्थ बनेल अशी दृष्टि हवी आहे.

म्हणून रिझर्व बँकेकडून होणारा पैशाचा पुरवठा सहकारी संस्थांना समर्थ बनवीत आहे आणि पैशामुळें उत्पादनखर्च न वाढतां आटोपशीर होत आहे. या दोन मुख्य कसोट्या मानल्या पाहिजेत. बँकेकडून कर्जे पुरविणें सोपें आहे परंतु याचा उपयोग प्रभावीपणें ज्या कामाकरितां व्हावयास पाहिजे त्याच कामासाठी होतो कीं नाहीं हें पाहणें फार अवघड आहे. सहकारी चळवळीपुढें आज हीच मुख्य कामगिरी उभी आहे.

आज ही वस्तुस्थिति आहे कीं, बऱ्याच प्राथमिक सहकारी सोसायट्या चांगल्या प्रकारें चालविल्या जात नाहींत. पतपुरवठ्याच्या कार्यांत हा कच्चा दुवा आहे. कर्जवसुलींत ढिलाई आहे. थकबाक्या वाढत आहेत. १९५८–५९ सालीं सर्व भारतांत एकंदर कर्जपुरवठ्याच्या २० टक्के एवढी प्रा. सोसायट्यांची थकबाकी होती. यांतच भर घालणारी दुसरी खेदजनक गोष्ट अशी कीं, ज्या प्रमाणांत सहकारी कर्जपुरवठा वाढत आहे त्या मानानें सहकारी मालविक्री मात्र अजिबात वाढत नाहीं. याचा अर्थ असा कीं ग्रामीण पतपुरवठ्याच्या विस्तारकार्यांतील एक बाजू अद्यापि डळमळीत आहे. पतपुरवठा व सहकारी खरेदीविक्री यांची सांगड घातल्यानंतर होऊं शकणाऱ्या जादा कर्जपुरवठ्याचे लाभ आपणांस घेतां येत नाहींत व जो गरीब शेतकरी प्रत्यक्ष कष्ट करूं शकतो पण ज्याचेजवळ तारण नाहीं त्याला पैशाची मदत होऊं शकत नाहीं.

### सहकारी चळवळीची समस्या

म्हणून मला असें वाटतें कीं, आपल्या देशांतील सहकारी चळवळीचा आणि त्यांतहि सहकारी पतपुरवठ्याचा विकास सेवाभावी पुढारीपण आणि सर्व पातळींवर खूप कष्टसायास यांवर अवलंबून आहे. राज्य केंद्रीय बँका, मध्यवर्ती जिल्हा सहकारी बँका व प्राथमिक पतपुरवठा सोसायट्या या सर्व क्षेत्रांत परिश्रमशील कार्यकर्ते हवेत. योग्य नेतृत्वाची प्रेरणा आपल्या राजकीय

पुढाऱ्यांपासून मिळावी आणि बँकांचे अधिकारी व कर्मचारी यांनी जास्त तत्परता, कळकळ व कार्यक्षमता दाखवावी म्हणजे सहकारी संस्थांची स्थिति सुधारेल.

पण यापेक्षा ग्रामीण पुढारीपणाचा दर्जा सुधारणें महत्त्वाचें आहे. माझ्या निरीक्षणावरून असें वाटतें कीं, जर आपण वरच्या पातळीवर सहकारी क्षेत्रांत प्रभावशाली नेतृत्व करूं शकलों तर खेड्यापाड्यांतूनहि सत्पात्र पुढारीपण लाभूं शकेल. परंतु नवल याचें वाटतें कीं सर्वसाधारणत: पूर्वी सहकारी संस्थांतून जसें खंबीर कर्तृत्वशाली नेतृत्व होतें तसें आज मिळत नाहीं. त्या काळीं परकीयांची राजवट होती व बुद्धिमान् माणसांना जीवनांत मोठें स्थान मिळणें दुरापास्त होतें. म्हणून त्यांची शक्ति विधायक क्षेत्राकडे वळली हें एक कारण असेल.

आज मात्र राजकीय क्षेत्रांत स्थान-मानाच्या जागांचीं प्रलोभनें अनेक असल्यानें स्वाभाविकत: महत्त्वाकांक्षी लोकांचा ओढ तिकडे जात आहे. परंतु सहकारी चळवळीची यंत्रणा उभारण्यासाठी पूर्वी कधींहि भासली नसेल एवढी गरज सांप्रत अतिशय हुशार व दक्ष अशा पुढारी माणसांनीं व्यक्तिश: निकट राहून खटाटोप करण्याची आहे. आपणांस राजकीय जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी वरिष्ठ पातळीवर हुशार, कर्तव्यदक्ष पुढारी जसे हवेत तसेंच खालच्या पातळीवर लहान व कमी दिखाऊपणाच्या जागांवर काम करणारे बुद्धिमान् व तत्पर कार्यकर्तेहि हवेत. सहकारी चळवळीची हीच वास्तव समस्या आहे.

आपल्या देशाची धुरा वाहणारी थोर मंडळी या प्रश्नाकडे बारकाईनें लक्ष देतील अशी आशा वाटते. या बिकट प्रश्नाच्या सोडवणुकीचा कांहीं अंशीं एक उपाय असा आहे कीं, त्यांनीं यापुढें राजकीय पक्षांनीं लोकसभा वा विधानसभांसारख्या जागांवर आपले उमेदवार निवडतांना ज्यांना सहकारी कार्यक्षेत्रांत पुरेसें शिक्षण मिळालें आहे आणि विधायक कामगिरीमुळें ज्यांनीं लोकांचा विश्वास व आपुलकी कमाविली आहे, अशाच कर्तबगार व्यक्तींना प्राधान्य द्यावें.

### ध्येयनिष्ठा व कार्यक्षम यंत्रणा

परंतु येथें एक इशारा दिला पाहिजे. सहकारी क्षेत्रांत राजकीय पक्षोपक्षांनीं धुडगूस घालणें देशाच्या हिताचें नाहीं. कांहीं सहकारी बँकांच्या पंचमंडळाच्या निवडणुका राजकीय पक्षांच्या भूमिकेवरून लढविल्या जातात हें बरोबर नाहीं. कारण राजकीय पक्षनिष्ठेपेक्षा सहकारी तत्त्वप्रणालीस अधिक विघातक दुसरें कांहीं नाहीं. आपल्या वैयक्तिक राजकीय आकांक्षा सांभाळणें आणि राजकीय पक्षांतील दृष्टि ठेवून सहकारी संस्थांत उठावदार सेवा करणें यांची सांगड घालण्याचें काम फार बुद्धिचातुर्याचें व मुत्सद्देगिरीचें आहे तें यामुळेंच.

आपल्यापुढें मूलभूत प्रश्न आहे तो पुरेसा कर्जपुरवठ्याचा नव्हे. स्थूलमानानें हेंहि शक्य होईल परंतु त्यासाठीं या पैशाचा वापर यथायोग्य होईल अशी परिस्थिति निर्माण केली पाहिजे. म्हणून या क्षेत्रांत कर्जपुरवठ्याचीं लक्ष्यें निर्धारित करण्यास विशेष महत्त्व नाहीं. कारण सहकारी चळवळीच्या बळकटीवर हीं लक्ष्यें बदलत राहणार आहेत. म्हणून आपली शक्ति लक्ष्यें काय असावीत यापेक्षा सहकारी पतपुरवठा यंत्रणा कार्यक्षम कशी होईल यावर खर्च केली पाहिजे. चळवळीच्या सर्व अंग-प्रत्यंगांतून सहकारी ध्येयनिष्ठा रुजली पाहिजे.

मला असें वाटतें कीं, रिझर्व बँकेजवळ ही ध्येयनिष्ठा आहे. सहकारी पतपुरवठ्यासाठी अधिक साधनसामग्री उपलब्ध करण्याची बँकेची तयारी आहे. एकंदर कारभार-यंत्रणा कशी सुधारतां येईल, बँकेशिवाय अन्य मार्गांनें पैशाचा पुरवठा कसा करतां येईल इ. विचार होत आहेत, परंतु या गोष्टी तिसऱ्या पं. वा. योजनेंत आपण आपलीं लक्ष्यें गांठण्याकरतां करावयाच्या उपाययोजनेच्या मुख्य कामगिरीपुढें गौण स्वरूपाच्या आहेत.

गेल्या कांहीं वर्षांत केंद्रीय बँका आणि सहकारी जिल्हा मध्यवर्ती बँका यांनीं सर्वसाधारणत: त्यांच्या कार्याच्या कक्षा विशाल केलेल्या आहेत व कामकाजाच्या पद्धतींत सुधारणा केलेल्या आहेत. एरव्हीं रिझर्व बँकेस जास्त भरीव प्रमाणांत पैसा पुरविणें अशक्य होतें. परंतु या बँकांपुढें असलेली संकल्पित कामगिरी आजवरच्या यशसिद्धीपेक्षा फार विराट स्वरूपाची आहे.

---

## २५ वर्षांचें सिंहावलोकन

(अर्बन को. बँक लि., सांगलीच्या रौप्य-महोत्सवप्रसंगीं प्रसिद्ध केलेली इतिहास-पुस्तिका)



श्री. म. ह. गोडबोले
(चेअरमन)

अर्बन को. बँक लि., सांगलीच्या संस्थापकांपैकीं एक संस्थापक, त्यानंतर संचालक मंडळाचा सदस्य म्हणून गेलीं दोन तपें बँकेशीं सतत संबंधित आणि रौप्यमहोत्सवी वर्षांतील बँकेचा कार्याध्यक्ष ह्या नात्यानें श्री. म. ह. गोडबोले, बी. ए., एलएल. बी., ह्यांनीं लिहिलेल्या ह्या पुस्तिकेचें प्रकाशन श्री. वैकुंठभाई मेहता ह्यांच्या हस्तें झालें. ह्या पुस्तिकेंत केवळ अर्बन को. बँकेच्या स्थापनेचा व वाढीचाच इतिहास दिलेला नसून सांगली शहर व संस्थान ह्यांतील सहकारी व व्यापारी बँकिंगचा तुलनात्मक परिचय करून देण्यांत आला आहे, तो अत्यंत उद्बोधक आहे. सांगली शहराचा विकास, सांगलींतील बँक व्यवसायाची पूर्वपीठिका, सांगली संस्थानांतील सहकारी चळवळ, अर्बन बँकेची स्थापना, स्थानिक व्यापारी बँक व बाहेरील बँकांच्या शाखा, सांगलींतील अन्य बँका, सांगली बँक क्लिअरिंग हाऊस, रिझर्व्ह बँक, व्यापारी व सहकारी बँकांतील मूलभूत फरक, राज्य सरकार व अर्बन बँका, सहकारी संघ, को. बँक्स असोसिएशन, इत्यादि शीर्षकांवरून त्यांतील उपयुक्त माहितीची कल्पना येईल. शेवटीं १२ परिशिष्टांत बँकेविषयीं माहिती तपशीलानें देण्यांत आली आहे. “१९४८ सालीं म. गांधीवधोत्तर सांगली येथें जी जाळपोळ आणि लुटालूट झाली, त्या वेळीं बँकेनें १५ दिवसांचे आंतच जळितपीडित बांधवांना कर्जरूपानें मदत केली, ती कामगिरी बँकेच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी आणि भूषणास्पद झाली” असें कृतज्ञताप्रदर्शक प्रातिनिधिक पत्र पुस्तिकेचे अखेर छापण्यांत आलें आहे.

---

### खताच्या कारखान्यांना परवाने

भारत–सरकारनें आंध्र, राजस्थान व मध्यप्रदेश ह्या राज्यांत प्रत्येकीं एक खताचा कारखाना काढण्यास परवाने देण्याचें ठरविलें आहे. पण, ह्या कारखान्यांचा कारभार मॅनेजिंग एजंटांकडे न सोपवितां तो कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें चालविला पाहिजे अशी अट घालण्यांत येणार आहे. खर्चांत बचत व्हावी म्हणून ही अट घातली जात आहे.

## तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमासाठी जर्मनीची मदत

भारताच्या विकासासाठी आर्थिक मदत करणाऱ्या देशांची एक बैठक पुढील महिन्यांत वॉशिंग्टन येथें भरणार आहे. ह्या बैठकींत भारताला देण्यांत यावयाच्या मदतीबद्दल कांहीं योजनाबद्ध कार्यक्रम आखण्यांत येण्याचा संभव आहे. दरम्यान पश्चिम जर्मनीकडून भारताला तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत २५० कोटी रुपयांची मदत देण्यांत येणार असल्याची वार्ता आहे. तथापि ह्या बाबतींत जर्मन सरकारनें अद्याप अधिकृत घोषणा केलेली नाहीं. परदेशांकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीचें भारत सरकारकडून नेहमींच स्वागत करण्यांत येतें. पण जर्मन सरकारकडून मिळणाऱ्या मदतीचा आंकडा २५० कोटी रुपयांवरच थांबला तर तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या परदेशीय चलनांतील गरजा पूर्णपणें भागवितां येणार नाहींत. जर्मनीकडून मिळणारी मदत २५० कोटींपेक्षा अधिक असणारच नाही असें नाहीं. परंतु त्यापेक्षा अधिक मदत मिळणें हें जर्मनींतील राजकीय परिस्थितीवर आणि निःशस्त्रीकरणाच्या बाबतींत होणाऱ्या प्रगतीवर अवलंबून आहे. निःशस्त्रीकरणाच्या बाबतींतील प्रगति ही सर्व जगाच्याहि दृष्टीनें महत्त्वाची आहे. ह्या बाबतींत प्रमुख देशांत कांहीं समजूत झाल्यास त्या देशांना मागासलेल्या देशांतील सरकारांना व लोकांना अधिक आर्थिक मदत देणें शक्य होणार आहे. अमेरिका, ब्रिटन, प. जर्मनी व रशिअन गटांतील राष्ट्रें ह्या सर्वांकडूनच मग अधिक मदत मिळण्याची शक्यता आहे. भारताला मदत देऊं इच्छिणाऱ्या देशांत आतां इटली, फ्रान्स, हॉलंड व ऑस्ट्रिआ ह्यांची भर पडलेली आहे. जपानकडूनहि भारताला १०० कोटी रुपयांची मदत मिळण्याची शक्यता आहे.

## छोट्या मोटारगाडीचा कारखाना काढण्यास मदत

भारतांत 'व्होक्सवॅगन' ह्या छोट्या गाड्या तयार करण्यासाठी एक मोठा कारखाना काढण्यांत यावा आणि तो काढण्यासाठी पश्चिम जर्मन सरकारनें मदत करावी अशी सूचना जर्मनींतील एका प्रमुख वृत्तपत्रानें केली आहे. 'व्होक्सवॅगन' ही छोटी गाडी जर्मनींत फार लोकप्रिय झालेली आहे. ह्या वर्षी अशा १० लाख गाड्या जर्मनींत तयार करण्यांत येतील असा अंदाज आहे. त्या बहुतेक सर्व निर्यात करण्यांत येतील. तथापि असा कारखाना काढण्याच्या कामांतील अडचणी बऱ्याच आहेत. प्रथम अशा कारखान्यांत तयार होणाऱ्या गाड्या संख्येनें थोड्याच राहतील. त्यामुळें त्यांच्या किंमतीहि फार असतील. संकल्पित कारखान्यांत काम करण्यासाठी हजारों हिंदी कामगारांना उत्कृष्ट जर्मन तंत्रज्ञांच्या हाताखाली शिक्षण घ्यावें लागेल. सध्यां जर्मनीमध्येंच कुशल तंत्रज्ञांचा व कामगारांचा तुटवडा आहे. त्यामुळें असें शिक्षण देण्यास पुरेशी माणसें उपलब्ध होणें कठीण आहे. भारतांत तयार झालेल्या व विकल्या गेलेल्या छोट्या मोटारगाड्यांची देखभाल करण्यासाठी बरींच केंद्रें स्थापन करावीं लागतील. अशा केंद्रांच्या उभारणीसाठी बरीच मोठी रक्कम गुंतवावी लागेल. पण सुरुवातीला छोट्या गाड्यांची संख्या बेताची असल्यामुळें ह्या गुंतवणुकीवर फारसा नफा होणार नाहीं. ह्या अडचणी लक्षांत घेऊनसुद्धां 'व्होक्सवॅगन'चा कारखाना काढण्यास भारताला मदत करावी असा सल्ला वरील वृत्तपत्रानें दिला आहे. भारतामधील मोटारींच्या बाजारांत उतरण्याची ही संधि जर्मनीनें गमावल्यास ब्रिटिश, फ्रेंच, जपानी अगर झेकोस्लोव्हाक कंपन्या संधीचा फायदा घेतील व बाजारपेठ जिंकतील असा इषाराहि देण्यांत आला आहे.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४१ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर २॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या ठेवींच्या आकर्षक दरासंबंधी चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान


★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चात मनपसंत व्यवस्था

सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

कॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.




बेडेकर

मसाले, लोणची व पापड

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील

वापरून पहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखा : ठाकुरद्वार, दादर, कोट व पार्ले.

### औद्योगिक शक्तीसाठी अधिक विजेची जरूरी


भारताच्या औद्योगीकरणांत विजेनें मिळणाऱ्या औद्योगिक शक्तीला महत्त्वाचें स्थान आहे. निरनिराळीं घटक राज्यें औद्योगिक शक्तीच्या विकासाच्या योजना आंखत आहेत. तरीपण मागणीच्या मानानें विजेचा पुरवठा अपुरा पडत जाण्याची शक्यता दिसत आहे. सेंट्रल वॉटर अँड पॉवर कमिशनच्या अध्यक्षांनीं बंगलोर येथें एका प्रसंगीं भाषण करतांना ह्या बाबतींत सावधगिरीचा इषारा दिला आहे. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं भारतामधील औद्योगिक शक्तीचा–विशेषत: विजेच्या शक्तीचा-विकास करण्याच्या योजना फार अपुऱ्या आहेत. औद्योगीकरणाची गति जसजशी वाढत जाईल तसतशी औद्योगिक शक्तीची मागणी वाढतच जाणार आहे. आजच देशांत औद्योगिक शक्तीची मोठ्या प्रमाणावर टंचाई दिसून येत आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत विजेच्या शक्तीच्या उत्पादनासाठी अधिक आर्थिक तरतूद करण्यांत आलेली आहे. तथापि, तरीसुद्धां औद्योगिक शक्तीची टंचाई कमी होण्याचा फारसा संभव नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत आणखी ८० लाख किलोवॅट वीज निर्माण करण्याचें उद्दिष्ट पुढें ठेवण्यांत आलें आहे. देशांतील एंजिनिअर्सना हें एक आव्हानच आहे, असें समजण्यास हरकत नाहीं. एंजिनिअर्स हें आव्हान स्वीकारतील ह्यांत शंका नाहीं. पण ह्या बाबतींत सरकारच्या कारभारयंत्रणेच्या सहकार्याची अपेक्षा आहे. कार्यक्रमांतील उद्दिष्ट गांठण्यासाठी एंजिनिअर्सना जागच्याजागीं निर्णय घेण्याचें स्वातंत्र्य देण्यांत आलें पाहिजे. शिवाय देशांतील अगर परदेशांतील अधिक पैसा वीजनिर्मितीच्या कामाकडे वळविण्यांत आला पाहिजे.

### भारतामधील विद्युत्–सामग्रीचा नवा कारखाना

भारतांत सार्वजनिक मालकीच्या विभागांत विजेची भारी यंत्रसामग्री निर्माण करण्याचा आणखी एक कारखाना रशिआच्या मदतीनें काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासंबंधींचा प्राथमिक अहवाल रशिअन तज्ज्ञांकडून लवकरच सादर केला जाईल. कारखान्यांतील कोणता भाग हिंद सरकारनें उभारावयाचा व कोणता भाग रशिआनें उभारावयाचा ह्यासंबंधीं लवकरच वाटाघाटी सुरू होतील. रशिअन तज्ज्ञ भारतांत आल्यावर कारखान्यासाठी जागा निवडण्यांत येईल. कारखाना उत्तर भारतांत काढण्यांत येणार आहे. उत्तर प्रदेश, राजस्थान व पंजाब राज्यांचीं सरकारें कारखाना आपल्या राज्यांत काढण्यांत यावा म्हणून खटपट करीत आहेत. दक्षिण भारतांत झेकोस्लोव्हाकिआच्या मदतीनें असाच कारखाना काढण्यांत येणार आहे.

### मागासलेल्या देशांना पश्चिम जर्मनीची मदत

पश्चिम जर्मनीकडून मागासलेल्या देशांच्या आर्थिक विकासासाठी अधिकाधिक मदत मिळणार आहे. चालू वर्षीं पश्चिम जर्मनी १०० कोटी डॉलर्स ह्या कामीं खर्च करणार आहे; ह्यापैकी कांहीं रक्कम गरजवंत देशांना प्रत्यक्षपणें दिली जाणार आहे. जागतिक बँकेतर्फे नाहीं. मदत घेणाऱ्या देशांपैकी कांहीं देशांतील लोकांची अशी समजूत झालेली आहे कीं जागतिक बँक ही संस्था भांडवलशाहीच्या हातांतील आहे. म्हणून कांहीं मदत थेट देण्यांत येणार आहे. मदत घेणाऱ्या देशांत आग्नेय आशिया, आफ्रिका व मध्य व दक्षिण अमेरिकेंतील कांहीं देश आहेत. परंतु त्यांत भारत हा देश मोठ्या प्रमाणावर मदत घेणारा असेल.



आज बाजारात अनेक ब्राम्ही तेलें उपलब्ध आहेत; परंतु ब्राम्ही तेलाच्या मूळ कल्पनेचें श्रेय सांडू बंधूनाच द्यावें लागेल. सांडू बंधूंच्या आयुर्वेदावरील प्राचीन ग्रंथांच्या गाढ्या व्यासंगाचें तें फळ आहे. ह्या ग्रंथांतून 'ब्राम्ही' या अल्पमोली परंतु बहुगुणी वनस्पतीचा, मेंदूच्या अगर उष्णतेच्या विकारांवर उपयोग सांगितला आहे. त्यावरूनच श्री. दत्तात्रेय कृष्ण सांडू यांना ब्राम्ही वनस्पतीयुक्त तेल करण्याची कल्पना सुचली. औषधी म्हणून अथवा एरव्हीं सुगंधी तेल म्हणून लावण्यास उपयोगी पडणारें बहुगुणी तेल तयार करण्यासाठीं त्यांनी प्रयोग सुरू केले व भारतांत प्रथमच "ओरिजिनल ब्राम्ही तेल" तयार करून तें लोकप्रिय केलें.

महत्त्वाचें पाव



१८९९-१९६०

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रा. लि. चेंबूर-मुंबई ७१

दत्तात्रेय कृष्ण सांडू ब्रदर्स चेंबूर प्रायवेट लि. हीरक महोत्सव

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक: –श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति । [ किं. १ रु. ८ आ.

## भोर स्टेट बँक लि.

( स्थापना १९४४ )

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.

शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,०८,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष

श्री. गो. वा. देवी — श्री. वा. म. धंधुके

## दि बेळगांव बँक लि., बेळगांव

दि बेळगांव बँक लि. ला ३१ डिसेंबर, १९६१ असेरच्या वर्षी मागील शिलकी नफा (रु. ४,११६=२०) धरून, रु. १,७५,८३९=११ नफा झाला. रिझर्व्ह फंडांत ४०,००० रु. घालून, आणि ६९,००० रु. ची इनकमटॅक्सची तरतूद करून ९% करपात्र डिव्हिडंडसाठी ६२,८६४ रु. चा विनियोग करण्यांत येणार आहे. १९६१ चा नफा १९६० च्या नफ्यापेक्षा अर्ध्या लाखांनीं जास्त आहे. रिझर्व्ह बँकेच्या कर्जविषयक निर्बंधामुळें व्यवसायक्षेत्राला मर्यादा पडली. अहवालाचे वर्षी २ रु. वाढाव्यानें विक्रीस काढलेले प्रत्येकी १० रु. चे २०,००० भाग पूर्णपणें खपले, इतकेंच नव्हे तर सर्व मागणी पुरी पाडतां आली नाहीं. वसूल भांडवल आतां ८ लक्ष रु. झालें असून शेअर्सवरील वाढाव्यासुद्धां ३,६१,९८२ रु. एवढी रक्कम रिझर्व्ह व इतर फंडांत आहे. ठेवीहि १,७४,३०,२१६ रु. वर गेल्या आहेत. बँकेच्या आकारापेक्षा तिची कार्यक्षमता आणि सचोटी ह्यांवरच तिची मजबुती अवलंबून असते आणि अशा प्रगतिपर बँकांविषयीं जनतेनें निर्धास्त असायला हरकत नाहीं, हें बँकिंग क्षेत्रांतील ताज्या घडामोडींनीं सिद्ध केलें आहे. बेळगांव बँकेचा त्याबाबत लौकिक त्या क्षेत्रांत सुप्रसिद्ध आहे.

---

## लग्नासंबंधीं पाकिस्तान सरकारचा वटहुकूम

मुसलमानांना त्यांच्या कुराणप्रणीत धर्माप्रमाणें एकापेक्षा अधिक बायका करण्याचा अधिकार आहे. परंतु ह्या अधिकाराचा दुरुपयोग होत असल्याचें आढळून आल्यानें पाकिस्तान सरकारनें लग्नाच्या हक्कासंबंधीं वटहुकूम काढला आहे. ह्या वटहुकुमाप्रमाणें एखाद्या मुसलमानाला पहिली बायको जिवंत असतां पुन्हा लग्न करावयाचें असलें तर त्यानें पहिल्या बायकोची परवानगी घेतली पाहिजे. त्याचप्रमाणें वटहुकुमान्वयें स्थापन करण्यांत आलेल्या लवाद-मंडळाचीहि परवानगी त्यानें घेतली पाहिजे. लवाद मंडळांत पतिपत्नींचा एक एक प्रतिनिधि असेल. घटस्फोट घेण्यासाठी सुद्धा मुसलमान नवऱ्याला आपल्या हेतूची जाणीव लवाद मंडळाला द्यावी लागेल. मुलींचें लग्नाचें वय १४ वरून १६ पर्यंत वाढविण्यांत आलें आहे.

---

## ठेवींवरील व्याजाबाबत इंटर-बँक नवा करार

| ठेवी | | ठेवींवरील नवे कमाल दर नोव्हेंबर१९६० | नवे दर |
|---|---|---|---|
| **नोटिशीनें परत करावयाच्या** | | | |
| ३ ते २१ दिवस | ... | २ | ३ |
| २१ पेक्षा जास्त दिवस | ... | २ | ३ |
| **मुदती ठेवी** | | | |
| ३–२१ दि. | ... | २ | ३ |
| २२–३० | ... | ३ | ३ |
| ३१–६० | ... | ३¼ | ३½ |
| ६१–९० | ... | ३½ | ३½ |
| ९१ दि. ते १२ महिने | ... | ३½ | ३¾ |
| १२–२४ महिने | ... | ३¾ | ४ |
| २४–४८ महिने | ... | ४ | ४½ |
| ४८–६० महिने | ... | ४½ | ४½ |
| ६० व जास्त महिने | ... | ४½ | ५ |
| **व्हिंग्ज बँक खातीं** | | | |
| ५०,००० रु. पर्यंत | ... | २½ | ३ |

## भोर स्टेट बँक लिमिटेड, भोर

३१ डिसेंबर, १९६० असेरच्या व्यवहारांत बँकेस निव्वळ नफा रुपये १०,७७६=७४ नये पैसे झाला. यामध्यें मागील सालचा शिल्लक राहिलेला नफा रुपये १०७·५८ नये पैसे मिळवितां एकूण नफा रुपये १०,८८४=३२ नये पैसे पुढीलप्रमाणें वांटावा अशी संचालक मंडळाची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| (१) रिझर्व्ह फंडाकरतां तरतूद | २,१६०=०० |
| (२) इन्कमटॅक्सकरतां तरतूद | ६,२००=०० |
| (३) बुडित व संशयित कर्जाकरतां तरतूद | २,३००=०० |
| (४) पुढील सालीं शिलकी नफा ओढणें | २२४=३२ |
| एकूण रुपये | १०,८८४=३२ |

बोर्डानें चालू सालीं भागावरील फायदा न वांटण्याचें ठरविलें आहे.

भोर, पाली व शिरवळ येथील कचेऱ्यांचे कारभार चालविण्याचे कामीं स्थानिक सल्लागार मंडळाची उत्तम प्रकारें मदत मिळत आहे. भोर, पाली व शिरवळ येथील सल्लागार-मंडळें तसेंच त्या ठिकाणचे स्थानिक सरकारी अधिकारी, बँकेचा नोकरवर्ग व सर्व खातेदार यांनीं केलेल्या सहकार्याबद्दल संचालकमंडळ आभारी आहे. भोर येथील बँकेच्या इमारतीमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीचे सोयीचा स्थानिक खातेदार चांगला उपयोग करून घेत आहेत. त्याचप्रमाणें भोर, पाली व शिरवळ येथें गोडाऊनचा व्यवहारहि समाधानकारक चालू आहे.

---

## पाकिस्तानची वाढती लोकसंख्या

पाकिस्तानची लोकसंख्या २४ टक्क्यांनीं वाढली आहे. १९५१ सालीं लोकसंख्या ७·६ कोटी होती, ती आतां ९·४ कोटी झाली आहे. ह्या लोकसंख्येंत स्त्रियांपेक्षा पुरुषांची संख्या सुमारें ५० लाखांनीं अधिक आहे. पश्चिम पाकिस्तानांत दर चौरस मैलांत १३६ लोक असें प्रमाण पडतें, तर पूर्व पाकिस्तानांत लोकसंख्या त्या मानानें खूपच दाट म्हणजे दर चौरस मैलाला ९२२ इतकी आहे. पश्चिम पाकिस्तानांत कांहीं भागांत दर चौरस मैलाला २ माणसें अशी परिस्थिति सांपडते. त्याच्या उलट, पूर्व पाकिस्तानांत एका जिल्ह्यांत हें प्रमाण १,७६१ इतकें आहे. पाकिस्तानच्या वाढत्या लोकसंख्येबद्दल पाकिस्तानचे गृहमंत्री मि. झकीर हुसेन ह्यांनीं चिंता व्यक्त केली आहे.

---

## वृत्तपत्रांच्या किंमतींत वाढ

ब्रिटनमधील वृत्तपत्रांनीं वाढत्या खर्चामुळें आपल्या पत्राच्या किंमती वाढविल्या आहेत. टाइम्सची किंमत १ पेनीनें वाढविण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें डेली टेलिग्राफ, डेली मेल, व डेली हेरल्ड ह्या पत्रांनीं आपल्या किंमती २॥ पेन्स पासून ३ पेन्सपर्यंत वाढविल्या आहेत. डेली वर्कर ह्या कम्युनिस्ट पत्राची किंमत मात्र पूर्वीचीच म्हणजे ३ पेन्स राहणार आहे.

---

## जाहिरात व प्रसिद्धि खर्च

मध्यवर्ती सरकारच्या माहिती व जाहिरात विभागानें १९६० सालीं ह्या कामासाठी ५५·४६ लाख रुपये खर्च केले. १९५४–५५ सालीं विभागानें ४२६ वृत्तपत्रांचा उपयोग केला होता. १९६० सालीं १९६१ वृत्तपत्रांचा उपयोग करण्यांत आला.

**बॉक्साइटच्या निर्यातीचा करार**— अल्युमिनम तयार करण्यासाठीं लागणारें बॉक्साइटचें खनिज ऑस्ट्रेलिआला निर्यात करण्याचा दीर्घ मुदतीचा करार भारतामधील एका कंपनीनें केला आहे. हें बॉक्साइट सौराष्ट्रामधील खाणींतून पुरविण्यांत येणार आहे. सौराष्ट्रामधील हें खनिज किंमतीच्या दृष्टीनें विकत घेणें ऑस्ट्रेलिआला परवडत आहे. हा करार स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनच्या मार्फत करण्यांत आला.

**आकाशयानाचें लष्करी महत्त्व**— रशिआनें शुक्राच्या रोखानें सोडलेल्या आकाशयानाला लष्करी दृष्ट्या महत्त्व असल्याचें सांगण्यांत येत आहे. अशा प्रकारच्या आकाशयानांतून पृथ्वीवर अचूक बाँबहल्ला करतां येईल असें शास्त्रज्ञांचें मत आहे. अमेरिकेला असें आकाशयान सोडण्यास ८ महिन्यांपासून ३ वर्षांपर्यंत काळ लागण्याचा संभव आहे.

**जयपूरला योगकेंद्र**—जयपूर येथें यौगिक पद्धतीनें रोगावर उपचार करणारें एक इस्पितळ स्थापन करण्यांत येणार आहे. केंद्रांत संशोधनहि करण्यांत येणार आहे. इस्पितळांत ३० रोग्यांची सोय करण्यांत येणार असून मध्यवर्ती सरकारनें त्यासाठी ४० हजार रुपयांची वार्षिक मदत मंजूर केली आहे.

**गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन**—१९६० च्या डिसेंबरअखेर केरळ राज्यांतील गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन करणाऱ्या २५ योजना मध्यवर्ती सरकारनें मंजूर केल्या. त्या अंमलांत आणण्यासाठी ३९.९२ लाख रुपये मंजूर करण्यांत आले होते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत निरनिराळ्या राज्य सरकारांना ह्या कामासाठी मध्यवर्ती सरकारनें आर्थिक मदत दिलेली आहे.

**आंध्र सरकारचें नवें सचिवालय**— आंध्र सरकारनें बेगमपेठ येथें सचिवालयासाठी नवी इमारत बांधण्याचें ठरविलें आहे. इमारतीच्या बांधकामास लवकरच प्रारंभ होणार आहे. इमारतीच्या नमुन्यासाठी एंजिनिअर्सनीं ७ नकाशे सादर केले होते. त्यांपैकी वर्तुळाकार नकाशा मंजूर करण्यांत आला आहे. इमारत तीन मजली होईल.

**नवीं एंजिनिअरिंग कॉलेजें**—अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण मंडळाच्या पूर्वविभागाची बैठक कलकत्ता येथें भरली होती. मंडळाचे अध्यक्ष श्री. जहांगीर गांधी ह्या प्रसंगीं बोलतांना म्हणाले कीं, तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत पूर्वविभागांत ४ नवीं एंजिनिअरिंग कॉलेजें व १२ विविधोद्योगी शाळा स्थापन करण्यांत येणार आहेत.

**आंध्रांतील सहकारी साखर कारखाने**—आंध्र राज्यांत स्थापन करण्यांत यावयाच्या ५ सहकारी साखर कारखान्यांपैकी ४ कारखान्यांच्या उभारणीस प्रारंभ झाला आहे. त्यांपैकी निदान तीन साखर कारखाने तरी १९६१-६२ च्या हंगामांत सुरू होतील. सर्व कारखाने साखरेचें उत्पादन करूं लागले म्हणजे आंध्र राज्यांत आणखी ५०,००० टन साखर तयार होऊं लागेल.

**कराचींतील चढलेल्या किंमती**— पाकिस्तान सरकारनें पोलाद, मोटारींचे सुटे भाग, सिमेंट, टाइपरायटर्स, इत्यादींवरील नियंत्रणें रद्द केल्यामुळें ह्या वस्तूंच्या किंमती एकदम वाढल्या आहेत. औद्योगिक उत्पादन वाढविण्यासाठी पाकिस्तानच्या सरकारनें नियंत्रण घातलेल्या ५४ वस्तूंपैकी २९ वस्तूंवरील नियंत्रणें उठविलीं आहेत. सरकार किंमतीवर लक्ष ठेवून आहे.

## मुंबई राज्यांतील सहकारी साखर कारखान्यांची ३०-६-१९६० अखेरची सांपत्तिक परिस्थिति

| सहकारी साखर कारखान्याचें नांव | सभासद संख्या | | | उसाचें क्षेत्र (एकर) | कर्जाऊ भांडवल | | एकूण खेळतें भांडवल (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | उत्पादक | इतर उत्पादक | सहकारी सोसायट्या | | इ. का. को. (रु.) | मध्यवर्ती बँकेचे (रु.) | |
| **अहमदनगर जिल्हा** | | | | | | | |
| (१) प्रवरा | १४३६ | ३ | १८ | ३५८१ | — | ५६,५१,३२९ | २,८४,१५,५११ |
| (२) कोपरगांव | ९३७ | ७ | २८ | २९३८ | २५,४२,६८२ | ५८,५७,२४० | २,११,७०,३१० |
| (३) अशोक | ११२९ | — | २३ | ७,००० | ४९,५०,००० | ७५,९८,१८३ | २८,८३,९८६ |
| (४) राहुरी | १३८८ | — | २२ | ३५०० | ३९,५०,००० | ७०,७०,६६० | १,९०,७५,६०९ |
| (५) गणेश | १७२८ | २ | ३५ | ३९८९ | ४९,५०,००० | ६५,७२,५९८ | १,८७,८९,७६७ |
| **पुणें जिल्हा** | | | | | | | |
| (६) माळेगांव | १४१० | १ | १७ | २९९० | ४५,१३,५१० | ४८,१५,८१९ | १,५३,५४,६६४ |
| (७) श्री छत्रपति शिवाजी | ७०५ | १ | १० | २३८६ | १८,९४,४७१ | ३४,२८,४२५ | १८,७४,३८५ |
| **उत्तर सातारा जिल्हा** | | | | | | | |
| (८) श्रीराम | १४६० | ६४ | १८ | ३३३३ | ४०,१०,४९१ | ५०,२४,५०३ | १,८२,२१,४५१ |
| (९) कृष्णा | १५८७ | ८ | ४० | ३३३७ | ७५,००,००० | ४५,००,००० | ७१,०५,८३१ |
| **दक्षिण सातारा जिल्हा** | | | | | | | |
| (१०) शेतकरी | १५५९ | ४० | ४७ | ३३०० | ६४,७५,००० | ६६,१९,९२० | १,७७,३५,९३१ |
| **कोल्हापूर जिल्हा** | | | | | | | |
| (११) श्री पंचगंगा | १६८७ | ३२ | ६३ | ३२३० | ६४,७५,००० | ६२,६७,११७ | १,७२,७०,८५८ |
| (१२) श्री वारणा | १७६८ | २१ | ३१ | २६६६ | ६४,७५,००० | ६१,७५,७४८ | ६०,०४,६१९ |
| (१३) श्री भोगावती | १६७४ | २ | २३ | ४००० | ६५,००,००० | ७६,५५,४३७ | १,६१,७५,५२१ |
| (१४) दूधगंगा वेदगंगा | १८४८ | ५ | २२ | ९६३५ | — | — | — |
| **नाशिक जिल्हा** | | | | | | | |
| (१५) गिरणा | ११८३ | — | २३ | ४००० | — | — | ९०,२१,८०० |
| एकूण | १९,९४६ | १२६ | ६७३ | ५७,६१५ | ५,३७,६१,१५४ | ७,०६,१७,०५९ | १६,१३,६७,३१७ |
| + | १५५९ | ४० | ४७ | ३३०० | ६४,७५,००० | ६६ १९,९२० | १,७७,३५,९३१ |
| एकूण | २१,५०५ | १६६ | ७२० | ६०,९१५ | ६,०२,३६,१५४ | ७,७२,३६,९७९ | १७,९१,०३,२४९ |

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

अधिकृत भांडवल ... रु. ५०,००,०००
विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. २५,००,०००
वसूल भांडवल ... रु. १२,५०,०००

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाईस चेअरमन ( संचालक, सकाळ )
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ४५५ रविवार पेठ, पुणें
गो. गं. साठे मॅनेजर



नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर



दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★



महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

( शिड्यूल्ड बँक ) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** ( स्थापना १९३६ )

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )

मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

—: संचालक मंडळ :—

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर-कमलाकांत छोटालाल अँड को. ( इम्पोर्टर्स, एक्स्पोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड काच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—वी. वाय्. पाठक, जॅ. मॅनेजर

## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

स्थापना : १९११

टेलिफोन, नं. २५५४७४-७५ | पोस्ट बॉक्स नं. ७३२, तारेचा पत्ता—कामर्सबँक

मुख्य कचेरी—९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई

चेअरमन : श्री. प्रा. ध. रा. गाडगीळ

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | |
|---|---|
| भरणाई झालेलें भांडवल | रु. १ कोटी, ४५ लक्ष |
| गंगाजळी व फंड | रु. ७२ ,, |
| ठेवी | रु. १४ कोटी, १६ लक्ष |
| खेळतें भांडवल | रु. २७ कोटी |

महाराष्ट्र राज्यांतील, शाखा व संलग्न बँका ३०४

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींसाठी चौकशी करावी.

चिं. द. दाते,
कार्यकारी संचालक.



## दि मिरज स्टेट बँक, लि.

हेड ऑफिस : मिरज

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९१९

| | |
|---|---|
| वसूल शेअर भांडवल | : रुपये सहा लाख |
| खेळतें भांडवल | : रुपये एक कोट |
| रिझर्व्ह फंड व इतर फंड | : रुपये सात लाख |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर

(१) तीन वर्षे मुदत ठेवीकरितां व्याज दर ४ टक्के.

(२) पांच वर्षे मुदत ठेवीकरतां व्याज दर ४½ टक्के.

हेड ऑफिस मिरजमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टसूची उत्कृष्ट व्यवस्था.

बँकेच्या शाखा: सांगली (गणपति पेठ), सांगली (मार्केटयार्ड), कुर्डूवाडी, बार्शी, पंढरपूर, करमाळा व लक्ष्मेश्वर.

श्री. एन्. पी. कानिटकर, ॲड्व्होकेट, चेअरमन. | के. डी. शिराळकर, मॅनेजर.



## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : २४८३.

### सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरुन द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षें | : | २¾ टक्के |
| ३ वर्षें | : | ३ टक्के |
| ५ वर्षें | : | ३½ टक्के |
| १० वर्षें | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २. ता. ३१–७–५७ | वा. ग. आळतेकर, कार्यकारी संचालक



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.

★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.